# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.

## मा.क प्रभाग समिती सभा

## कार्यपत्रिका क्रमांक- ७

## स भा वृ त्तां त

**दिनांक ७-९-२०१६** **वेळ-सकाळी ११.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यामा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.७/०९/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा.शितोळे शैलजा बाबुराव** **सभापती**

२) मा.सावळे सिमा रविंद्र

३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

४) मा.भोसले राहूल हनुमंतराव

५) मा.पालांडे सुजाता सुनिल

६) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७) मा.गिता सुशिल मंचरकर

८) मा.जगताप नवनाथ दत्तू

९) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

११) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१२) मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१३) मा.गायकवाड संध्या सुरदास

१४) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१५) मा.शेंडगे आशा सुखदेव

१६) मा.मोटे किरण बाळासाहेब

१७) मा.सतिश सदाशिव काटे स्विकृत सदस्य

१८) मा.गणेश आनंदराव ढोरे स्विकृत सदस्य

१९) मा.हमीद नवाब शेख स्विकृत सदस्य

याशिवाय मा.आण्णा बोदडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.प्रशांत पाटील-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.जयंत बरशेट्टी-कार्यकारी अभियंता पापु, मा.प्रदीप पुजारी- कार्यकारी अभियंता झोनिपू, मा.पोरेड्डी- उपअभियंता, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्था.,मा.शिंदे- उपअभियंता, मा.वायकर- उपअभियंता, मा.जाधव- उपअभियंता स्था/उदयान, मा.सोनवणे-उपअभियंता विदयुत, मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु, श्री.देवरे- कनिष्ठ अभियंता झोनिपु, श्री.भंडारी- कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्री.पटेल- उदयान अधिक्षक,श्री.माळी- मुख्य आरोग्य निरीक्षक पशुवैदयकीय,श्री.बेद - मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता अंतर्गत तरतूद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक-२) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता अंतर्गत तरतूद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक-३) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता अंतर्गत तरतूद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक-४) रस्त्याचे नामकरणाबाबत- मा.शैलजा शितोळे, मा.अतुल शितोळे,मा.नवनाथ जगताप,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) सांगवीफाटा उड्डाणपूल नामकरणाबाबत- मा.नवनाथ जगताप,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) प्रभाग क्र. ३९ संत तुकाराम नगर येथील महेशनगर चौकातील फाऊंटेन काढणेबाबत- मा.सुजाता पालांडे,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) सभेची वेळ बदलणेबाबत- मा.सिमा सावळे,मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

----

दिनांक ३/८/२०१६ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १९५ विषय क्रमांक- १

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. किरण मोटे अनुमोदक-मा.राजेंद्र काटे

संदर्भ- मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/वि/जा/६६७/२०१६ दि.१/९/२०१६

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता क प्रभाग विदयुत विभागाकडील विदयुत विषयक कामांवरील सन २०१६-१७ मधील वाढ/घट तरतुद प्रस्तावातील नमुद लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक- १९६ विषय क्रमांक- २

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. किरण मोटे अनुमोदक-मा.राजेंद्र काटे

संदर्भ- मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/वि/जा/६६८/२०१६ दि.१/९/२०१६

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता क प्रभाग विदयुत विभागाकडील विदयुत विषयक कामांवरील सन २०१६-१७ मधील वाढ/घट तरतुद प्रस्तावातील नमुद लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १९७ विषय क्रमांक- ३

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. किरण मोटे अनुमोदक-मा.राजेंद्र काटे

संदर्भ- मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/वि/जा/६६९/२०१६ दि.१/९/२०१६

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुत विषयक कामांकरीता क प्रभाग विदयुत विभागाकडील विदयुत विषयक कामांवरील सन २०१६-१७ मधील वाढ/घट तरतुद प्रस्तावातील नमुद लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

. सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- १९८ विषय क्रमांक- ४

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. नवनाथ जगताप अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा.शैलजा शितोळे,मा.अतुल शितोळे मा.नवनाथ जगताप,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.५८ संत तुकारामनगर गल्ली नं.२,नवी सांगवी स.नं.६६/२ ही संपुर्ण मिळकत बाबासाहेब गेनुभाऊ ढोरे पाटील यांच्या मालकीची आहे.संत तुकारामनगर गल्ली नं.२ या मार्गाला (रस्त्याला) **"कै.बाबासाहेब गेनुभाऊ ढोरे पाटील"** हे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १९९ विषय क्रमांक- ५

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. नवनाथ जगताप अनुमोदक-मा.राहूल भोसले

संदर्भ- मा.नवनाथ जगताप,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५८ मधील सांगवी फाटा येथील उड्डाण पुलास व ग्रेड सेपरेटर यांस **"महात्मा ज्योतिबा फुले"** असे नामकरण करण्यात यावे तसेच सांगवी फाटयाकडुन औंधकडे जाणा-या सब-वे ला **"ढोरे-पाटील सब वे"** असे नामकरण करावे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविदयालयाकडे जाणा-या रस्त्याच्या चौकास **"बाबुरावजी घोलप चौक"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेकामीचा प्रस्ताव मा.क प्रभाग समिती सभेपुढे ठेवणेत यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०० विषय क्रमांक- ६

दिनांक-७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. सुजाता पालांडे अनुमोदक-मा.रमा ओव्हाळ

संदर्भ- मा.सुजाता पालांडे,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ३९ संत तुकारामनगर येथील महेशनगर चौकात महापालिकेतर्फे फाऊंटेन तयार करणेत आला होता परंतु सद्दस्थितीत फाऊंटेन जुना झाला असुन तो काढून त्याजागी नवीन चौक सुशोभिकरण करण्यात यावे. तरी सदरचा फाऊंटेन काढणेकामीचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- २०१ विषय क्रमांक- ७

दिनांक- ७/९/२०१६ विभाग-

सुचक- मा. सिमा सावळे अनुमोदक-मा.नवनाथ जगताप

संदर्भ- मा.सिमा सावळे,मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या** बुधवारी सकाळी ११.३० वा. ऐवजी दुपारी ३.०० वाजता (**पहिल्या** बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

(महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१७ मतदार नोंदणी व जनजागृतीबाबतचे मा.सहाय्यक आयुक्त निवडणुक यांचेकडील पत्र क्र.निवडणुक/१/कावि/४८०/१६ दि.०२/०९/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रासंबंधीची माहिती मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी उपस्थित सन्मा.सदस्यांना पुढीलप्रमाणे माहिती दिली.)

**मा.क्षेत्रिय अधिकारी** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक२०१७ मध्ये शहरातील एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये म्हणुन मा.राज्य निवडणुक आयोग यांनी दिनांक १५/९/२०१६ ते दिनांक १४/१०/२०१६ या कालावधीमध्ये सर्व महानगरपालिका मधुन व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदार संघ स्तरावर मतदार नोंदणीची विशेष पुनरिक्षण मोहिम राबविणेबाबत सूचना केलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने वरील कालावधीमध्ये पिपरी चिंचवड महानगरपालिका अ/ब/क/ड/ई/फ या सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व विधानसभा मतदार संघाच्या मतदान केंद्राच्या पदनिर्देशित ठिकाणी मतदारांकडून मतदान नोंदणीविषयक अर्ज स्विकृतीसाठी मतदार सहाय्यता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. सदर मतदार सहाय्यता केंद्रावर शहरातील पात्र मतदारांकडून नवीन मतदार नोदणी / नांव व तपशिल दुरुस्ती/ स्थलांतर / मयत / दुबार/ वगळणी विषयक अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. या मोहिमेमध्ये जास्तीत जास्त पात्र मतदारांचा मतदार यादीमध्ये समावेश व्हावा यासाठी शहरामध्ये विविध माध्यमांद्वारे जनजागृती करणेचे कामकाज हे निवडणुक विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे.

सदरची मोहिम ही कालबद्द कार्यक्रमानुसार राबविणेत येणार आहे यासाठी विशेष मोहिमे अंतर्गत दिनांक १८ सप्टेंबर २०१६ (रविवार) व दिनांक ९ ऑक्टोबर,२०१६ (रविवार ) रोजी वर नमूद केलेल्या मतदार सहाय्यता केंद्रावर ही मोहिम राबविण्यात येणार आहे. यामधील पात्र मतदार आपले नांव मतदार यादीमध्ये नोंदवू शकतात. त्यासाठी या पत्राद्वारे आपणांस कळविण्यात येते की, आपले कार्यालयात होणा-या मासिक सभेमध्ये मा.नगरसदस्यांना मतदार नोंदणी मोहिमेची वरील माहिती देणे आवश्यक असून याकामी शहरातील पात्र मतदारांना मतदार यादीमध्ये नांवे समाविष्ठ करणेसाठी प्रवृत्त करणेकामीचे आव्हान मा.नगरसदस्य यांना दिनांक ७/९/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. झालेल्या क प्रभाग समिती सभेमध्ये विनंती करणेत आली.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)
सभापती
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/ ९०/२०१६.

दिनांक- ०८/०९/२०१६

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.